**श्री.अजयकुमार नष्टे,[redacted],उपविभागीय अधिकारी, जत उपविभाग जत यांचे न्यायालयात.**

दुरध्वनी क्रं. 02344/246134 Email-sdojath5@gmail.com

क्र.आरटीएस/अपील/२५४/२०२४

दिनांक-२४.०२.२०२५

**प्रति,**

१. अविनाश आनंदा शिंदे

२. अभिजित आनंदा शिंदे

दोघे रा. हिवरे, ता.जत जि.सांगली ..... **अपिलार्थी**

**विरुध्द**

१. पांडूरंग बापू शिंदे

२. मंडळ अधिकारी कुंभारी ता.जत जि.सांगली

अ.क्र.१ रा.हिवरे ता.जत जि.सांगली ..... **जाबदार**

**महाराष्ट्र जमीन महसूल अधिनियम १९६६ चे कलम २४७ प्रमाणे**

**निकालपत्र**

मौजे हिवरे, ता. जत, जि. सांगली येथील गट नंबर ३१ या वाद मिळकतीसंदर्भात मंडळ अधिकारी कुंभारी यांनी फेरफार क्र.३३६२ ची नोंद नामंजूर करणेचा आदेश पारीत केलेला होता. सदर आदेशावर व्यथित होऊन प्रस्तूत अपिलार्थी यांनी या न्यायालयात सदरचे अपिल दाखल केलेले आहे.

**प्रस्तुत अपिलकामी उभय पक्षकार यांना म्हणणे मांडणेसाठी रितसर नोटीसा देऊन सुनावणीसाठी पुरेशी संधी देण्यात आली.**

**अपिलार्थी यांनी आपले अपील अर्जामध्ये सारांशरूपाने पुढीलप्रमाणे मुद्दे मांडले आहेत.**

१. वाद मिळकत अपिलार्थी नं १ यांनी घेतलेले हे ०७.७५ आर व अपिलार्थी नं २ यांनी घेतलेले ० हे ०७.७५ क्षेत्राचे मिळकतीबाबत गाव दप्तरी फे. नं. ३३६२ चे दिनांक २०/०५/२०२४ रोजीचे प्रमाणभुत क्षेत्रापेक्षा कमी क्षेत्राचे हस्तांतरण होत असलेचे चुकीचे निष्कर्ष नोंदवुन अपिलार्थींनी रदद नोंदीवर नाराज होऊन प्रस्तुतचे अपिल कोर्टात दाखल केलेले आहे.

२. वाद मिळकत अपिलार्थी यांनी जाबदार नं १ यांचेकडून दिनांक १२/०४/२०२४ रोजी दस्त नंबर १९४९/२०२४ चे नोंदणीकृत दस्ताने प्रत्यक्ष कब्जेवहिवाटीत घेतले असून अपिलार्थीचा वाद दस्ताबाबत गावदप्तरी फेरफार नंबर ३३६२ ने नोंद धरणेत आली असता मंडल अधिकारी कुंभारी यांनी कोणतीही चौकशी व शहानिशा न करता त्याचप्रमाणे अपिलार्थीचे कोणतेही म्हणणे न घेता त्याच प्रमाणे अपिलार्थी हे सदर गटातील सहहिस्सेदार असलेचे देखील न बघता बेकायदेशिररित्या दिनांक २०/०५/२०२४ रोजी प्रमाणभुत क्षेत्रापेक्षा कमी क्षेत्राचे हस्तांतरण होत आहे असा चुकीचा निष्कर्ष नोंदवुन अपिलार्थी यांच्या दस्ताची नोंद रदद करून नामंजूर केलेली होती व आहे.

३. अपिलार्थी यांनी सदरची मिळकत नोंदणीकृत दस्ताने घेतलेली असून सदर दस्ताप्रमाणे नोंद झालेली असेल या आशेवरती गप्प राहिले परंतु सदर प्रकरणातील संपूर्ण माहिती व कागदपत्रे घेतलेनंतर अपिलार्थीचे दस्ताची नोंद जाबदार नं २ यांनी बेकायदेशिररित्या चुकीच्या आदेशाने रदद केलेचे ध्यानात येताच अपिलार्थीने अलाहिदा विलंब माफी सोबत प्रस्तुतचे अपिल दाखल केले असून सदर अपिलास जाबदार १ यांची तक्रार नसून सदर अपिलात यश येणेची अपिलार्थी यांना बालमबाल आशा असलेने प्रस्तुतचे अपिल अपिलार्थी यांनी खाली नमूद मुददयावर या मे. कोर्टात दाखल केलेले आहे. अपिलार्थी यांचे अपील मंजूर करणेत यावे.

**जाबदार यांनी त्यांचे लेखी युक्तीवादामधील सारांशरूपाने पुढीलप्रमाणे मुद्दे मांडले आहेत.**

अपिलार्थींचे अपिल खरे व बरोबर असून त्यामध्ये नमूद केलेला मजकुर जाबदार यांना मान्य व कबूल असून मंडल अधिकारी कुंभारी यांनी रदद केलेला फे. नंबर ३३६२ ची नोंद मंजुर करणेस व अपिल मान्य करणेस जाबदारची कसलीही तक्रार नव्हती व नाही.

**अपिलार्थी यांचा अपील अर्ज, जाबदार यांचा युक्तिवाद व प्रकरणी उपलब्ध कागदपत्र यांचे एकत्रित अवलोकन करता माझे निष्कर्ष खालीलप्रमाणे आहेत.**

१. मौजे हिवरे, ता. जत, जि. सांगली येथील गट नंबर ३१ मधील जाबदार १ यांचेकडून अपिलार्थी ०१ यांनी ००.०७.७५ हे.आर क्षेत्र व अपिलार्थी ०२ यांनी ००.०७.७५ हे.आर क्षेत्र नोंदणीकृत खरेदी दस्ताने घेतलेले आहे. सदर खरेदी दस्ताची नोंद मंडळ अधिकारी कुंभारी यांनी फेरफार क्र.३३६२ ची नोंद " प्रमाणभूत क्षेत्रापेक्षा कमी क्षेत्राचे हस्तांतरण होत आहे. नोंद नामंजूर " असा शेरा नमूद करून नोंद नामंजूर करणेचा आदेश पारीत केलेला होता. सदर आदेशावर व्यथित होऊन प्रस्तूत अपिलार्थी यांनी या न्यायालयात सदरचे अपिल दाखल केलेले आहे. सदर अपील दाखल करणेस अपिलार्थी यांना तीन महिने इतका विलंब झालेला असून विलंब माफी अर्ज दाखल केलेला आहे.

२. मुलत: अपिलार्थी व जाबदार ०१ यांचेमध्ये झालेला व्यवहार शासनाने ठरवून दिलेल्या निर्देशाप्रमाणे प्रमाणभूत क्षेत्रापेक्षा कमी असल्याचे दिसून येत आहे. त्याचबरोबर सदर प्रमाणभूत क्षेत्राच्या खरेदी विक्री-विक्री व्यवहारापैकी संबंधीतांनी सक्षम प्राधिकारी यांची कोणतीही पूर्व परवानगी घेतलेची दिसून येत नाही. त्यामुळे मंडळ अधिकारी, कुंभारी यांनी दिलेला निर्णय योग्य व कायदेशीर आहे.

३. त्यामुळे प्रकरणी वरील सर्व उपरोक्त वस्तुस्थितीचा व दाखल कागदपत्रांचे अवलोकन करता अपिलार्थी यांचे प्रस्तुत अपील अर्ज विलंब माफी अर्जासह फेटाळणे आवश्यक असलेबाबतचे माझे मत झालेने, मी, अजयकुमार नष्टे, उपविभागीय अधिकारी जत, उपविभाग जत पुढीलप्रमाणे आदेश पारीत करीत आहे.

<u>आदेश</u>

**प्रस्तुत अपील प्रकरण निकालपत्रातील नमूद कारणास्तव विलंब माफी अर्जासह फेटाळणेत येत आहे.**

खर्चासंबंधी कोणतेही आदेश नाहीत.

सदर आदेशाची अंमलबजावणी अपील कालावधी नंतर करणेत यावी.

सदर निकालाची समज सर्व संबंधिताना देणेत यावी.

प्रस्तुत निकालपत्र www.eqjcourts.gov.inया वेबसाईटवर पहाणेस उपलब्ध आहे.

(अजयकुमार नष्टे)
**उपविभागीय अधिकारी**
**जत उपविभाग जत**

ठिकाण -जत
दिनांक -२४.०२.२०२५

प्रत- तहसिलदार जत यांना माहितीसाठी व पुढील कार्यवाहीकरिता रवाना.